ISSN : 2348 – 604X (Print)
ISSN : 2348 – 6058 (Online)



# ISJ

# International Science Journal

(Peer-Reviewed)
Online and Print Version



| Volume 7 | Special Issue | 2020

Proceedings of the International Conference on Science and Science Fiction Organised by Shri Mukatanand College, Gangapur, Aurangabad, Maharashtra - India, 10th & 11th January, 2020

**Published Online at : http://www.sciencejournal.in**

ISJ
International Science Journal
Peer-reviewed www.sciencejournal.in

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोध निबंधाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | प्रस्तावना | | १ |
| | बीजभाषण | | ३ |
| १ | "मराठी विज्ञानकथेतील कल्पनाविश्व" | प्रा.डॉ. गोपीनाथ पा. बोडखे | १० |
| २ | अरुण हेबळेकरांची विज्ञान कादंबरी | शिवचरण प्रभाकर गिरी | १७ |
| ३ | सुबोध जावडेकरांच्या गुगली आणि आकाशभाकिते या विज्ञानकथा संग्रहातून लिंगभाव : एक दृष्टीकोन | डॉ.सचिन गंगाधर गिरी | २६ |
| ४ | डॉ. बाळ फोंडके विज्ञान साहित्यिक | स्मिता पोतनीस | ३१ |
| ५ | ग्रामीण कवितेतील वैज्ञानिक जाणिवा | डॉ. वैजनाथ कदम | ४३ |
| ६ | विज्ञान कथा :एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. रामदिनेवार गोविंद शंकरराव | ५१ |
| ७ | अरूण हेबळेकर यांच्या विज्ञान कादंबरीतील 'कल्पित' आणि वास्तव | श्री प्रविणसिंह बहादूरसिंह शिलेदार | ५६ |
| ८ | मराठी विज्ञान कथेतील यंत्रमानव | प्रा.डॉ.उमेश चांगदेव मुंढे | ६३ |
| ९ | महात्मा फुले यांचा समाज वैज्ञानिक दृष्टिकोण | डॉ. साहेबराव हिवाळे | ६८ |
| १० | मराठी वाङ्मयातील विज्ञान कथात्म साहित्य | प्रा. डॉ. वि. रा. राठोड | ७८ |
| ११ | विज्ञानसाहित्य आणि तेंडुलकरांचे मराठी नाटक | डॉ.संदीप अ.बनसोडे | ८३ |
| १२ | सुबोध जावडेकर यांच्या विज्ञानकथांमधील आशयविश्व | प्रा. दत्तात्रय शामराव मिठारी | 87 |
| १३ | लिंगभावात्मक दृष्टीक्षेप : विशेष संदर्भ डॉ. वृषाली किन्हाळकर | डॉ. आरती विठ्ठलराव शिंदे. | ९२ |
| १४ | वैज्ञानिक दृष्टीकोन आणि मराठी विज्ञान साहित्य | प्रा. डॉ. मीनाक्षी देव | ९८ |
| १५ | "मराठी विज्ञान कादंबरी प्रेषित" | प्रा.डॉ. प्रेमला मुखेडकर | १०४ |
| १६ | व्यंगचित्रकला एक स्वतंत्र साहित्यप्रकार | दिपक दादासाहेब अंकलखोपे | १०९ |
| १७ | वैज्ञानिक काळातील स्त्रीमुक्तीचा विचार | प्रा. डॉ. सविता वावगे | ११२ |

ISJ
International Science Journal
Peer-reviewed
www.sciencejournal.in

११

# विज्ञानसाहित्य आणि तेंडुलकरांचे मराठी नाटक

डॉ.संदीप अ.बनसोडे
मराठी विभागप्रमुख,
र.भ.अट्टल महाविद्यालय, ता.गेवराई, जि.बीड
भ्रमणध्वनी ९३२६२२८६८६
sandeepabansode07@gmail.com

मराठी साहित्य कथा, कविता, कादंबरी, नाटक या सर्व प्रकारांनी समृध्द आहेच सोबतच मराठी साहित्यामध्ये अनेक प्रवाह नव्याने उदयाला आले ज्यात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, इत्यादी साहित्याचा समावेश आहे मराठी साहित्यात जे जे नव साहित्य म्हणून उदयाला आले त्याचा सातत्याने मराठीने स्वीकारच केलेला आहे यापैकीच एक विज्ञानसाहित्य होय.

विज्ञानसाहित्याचा उगम पाश्चिमात्य देशात झाला. इंग्रजी भाषेतील पहिली विज्ञानकथा फ्रँकेस्टाईन ही १८१८ साली मेरी शेली या लेखिकेने लिहिली होती. त्यानंतर बऱ्याच काळानंतर इंग्रजी साहित्यात निर्माण झालेली विज्ञानसाहित्याचा प्रवाह हा मराठी भाषेतही यायला सुरवात झाली. विज्ञानकथेबद्दल सांगायचे झाल्यास विज्ञानकथेची सुरुवात सर्वप्रथम १९०० मध्ये कृष्णाजी आठले यांच्या ज्यूल्स व्हर्नच्या कादंबरीच्या 'चंद्रलोकची सफर' या नावाने केलेल्या अनुवादाने झाली. त्याचे प्रकाशन केरळकोकीळ या मराठी नियतकालिकात झाले. त्यानंतर १९११ साली श्रीधर रानडे यांनी लिहिलेल्या तारेचे हास्य वा.म. जोशी यांच्या अप्रकाशित किरणांचा दिव्य प्रकाश आणि वामलोचना १९१४ साली प्रकाशित झाल्या.

१९५० नंतर अनुवादीत विज्ञान कथाचे व कादंबऱ्यांचे लेखन पुन्हा सुरु झाले. भा.रा. भागवत यांनी ज्यूल्स व्हर्न आणि एच.जी. वेल्स यांच्या अराउंड द वर्ल्ड इन ८० डेज टेन्टी थाऊजंट लिग अंडर द सी, इनव्हिजीबल मॅन या कथा इथल्या मातीचा स्पर्श करुन लिहिल्या. त्या कथा बालमित्रमध्ये छापून येत होत्या त्यामुळे, त्या कथा जरी लहान थोर सर्वांना आवडल्या तरी विज्ञान कथेवर मात्र बालसाहित्य, साहसकथा असा शिक्का बसला. मात्र तरिही विज्ञानसाहित्याने आपले अस्तित्व सोडले नाही. पुढे कथा, कादंबऱ्यांनंतर नाट्य प्रकारातही विज्ञानसाहित्य मोठ्या प्रमाणात दिसू लागले अगदी त्या मराठी नाटकांना विज्ञान नाट्य असे नामाभिधान जरी प्राप्त झाले नसले तरी लिहिल्या गेलेल्या नाटके मात्र विज्ञानाची कास धरुनच लिहिल्या गेली होती. आणि याच धर्तीवर पुढे असाही विचार रुढ झाला की विज्ञान संप्रेषणासाठी नाटकाचे माध्यम एक अतिशय प्रभावी आणि लोकप्रिय पर्याय आहे आणि म्हणून सामाजिक महत्व असलेल्या पूर्वनिर्धारित विषयावर नाटके लिहिली गेली पाहिजेत ती सादर झाली पाहिजेत. यातूनच तरुण वर्गाला आकर्षित करणारे नाट्यलेखक विजय तेंडुलकर यांच्या लेखनीणे नुकतीच धुमाकुळ घालायला सुरुवात केली होती. त्यांचे विज्ञानाची कास धरणारे नाटक 'मित्राची गोष्ट' ने त्यांना पुन्हांदा एक वेगळीच ओळख निर्माण करुन दिली.


Volume - 7 Special Issue1, 2020, ISSN: 2348–604X (p); 2348–6058 (e), Impact Factor - 7.9 © 2020 DAMA International. Proceedings of the International Conference on Science & Science Fiction Organised by Shri Mukatanand College, Gangapur, Aurangabad (MS) - India, 10th & 11th January, 2020. Editors reserve all rights.

या नाटकाच्या कथानकाबद्दल विचार करत असताना लक्षात येते की, मित्रा आणि बापू एकाच कॉलेजमध्ये असतात, आणि बापूला कॉलेजच्या लॉनवर मित्राचा सिगारेट पीत असलेला पुरुषी वेशातला फोटो सापडतो. तो मित्राला परत द्यायला जातो आणि दोघांची तेथे ओळख होते, पुढे ओळखीचे रुपांतर मैत्रीत होवून मित्राच्या स्वतःमधील बदल बापूला सांगते आणि तिला स्वतःला पुरुष नाही तर ती स्वतः स्त्री असूनही तिला स्त्रीबद्दलचे आकर्षण आहे. पुढे बापू आणि मित्रामध्ये नमा नावाची मुलगी येते आणि मित्रा जी एक मुलगी आहे ती नमा नावाच्या मुलीच्या प्रेमात पडते. सुरुवातीला प्रतिसाद देणारी नमा नंतर तिला बॉयफ्रेंड भेटल्यावर व त्यांचे लग्न ठरल्यावर ती मित्राला टाळते, पण मित्रा तिचा पिच्छा पुरवते ज्याचा त्रास बापू, नमा आणि मित्रालाही होतो. मित्राच्या हट्टीपणामुळे तिचे बापू आणि नमा हे मित्र दुरावतात आणि मित्रा शेवटी आत्महत्या करते.

तेंडुलकरांनी रेखाटलेली सु(मित्रा)देवस्थळी नावाची ही मुलगी नक्की कशी आहे याचा विचार करताना, मित्राची भूमिका साकारणाऱ्या रोहिणी हट्टंगडी म्हणतात,"खरं म्हणजे नाटकामध्येच तेंडुलकरांनी मित्राला इतक छान रंगवल आहे की, आणखी अभ्यासाची गरज नव्हती. परंतु तरी आणखीही काही उकल होईल म्हणून लेस्बियनिझमवर वाचन केलं. या समलिंगी आकर्षणाचे प्रकार दोन एक परिस्थितीमुळे निर्माण झालेलं आणि एक शारीरिक हारमोनल डिसबॅलन्समुळे निर्माण झालेलं. मित्रा दुसऱ्या वर्गात मोडते. आजुबाजूला पाहात मोठी होत असताना स्वतःचं वेगळेपण तिला जाणवतं एका पॉईंटपर्यंत ती ते स्वीकारते, परंतु नंतर मात्र काहीशी त्याच्या आहारी जाते. कारणं अनेक - तिचा हट्टी स्वभाव, मनात घेतलं की करुन दाखवणारी समाजाचा विरोध - त्याबद्दल बंड" ज्या हारमोल डिसबॅलन्समुळे मित्रा इतरांपेक्षा वेगळी ठरते त्या डिसबॅलन्सचा ट्रान्ससेक्सुअल हा एक प्रकार असतो. *"Transsexualism is a gender identity disorder characterized by persistent discomfort and sense of inappropiateness about one's assigned sex, in a person who has reached puberty. The person is also preoccupied with getting rid of one's primary and secondary sex characteristics and acquiring the sex characteristics of the other sex. This disorder is subdivided according to the history of sexual orientation as (1) asexual (when the person reports never having had strong sexual feelings) (2) homosexual (where the person reports to homosexual arousal pattern) and (3) heterosexual (where the person claims to have had heterosexual orintation.)"* जी व्यक्ती ट्रान्ससेक्सुअल आहे अशा व्यक्तीला स्वतःलाच्या सेक्सबद्दल सतत असमाधान वाटत असते. आपला जो सेक्स आहे त्यापासून सुटका करुन घेवून दुसऱ्या सेक्सची विशेषता मिळवण्याचा त्या व्यक्तीचा प्रयत्न असतो. अशा व्यक्तीचे तीन प्रकार आहेत. १.ज्या व्यक्तीला लैंगीक भावनाच नाहीत त्यांना असेक्सुअल म्हणतात. २. ज्या व्यक्तीला समलिंगी आकर्षण असते त्याल होमोसेक्शुअल (समलिंगी) आणि ३.ज्या व्यक्तीला भिन्नलिंगी आकर्षण असते त्यांला हेटेरासेक्शुअल (भिन्नलिंगी) म्हणतात. या नाटकातील मित्रा ही दुसऱ्या वर्गात मोडते. मुळात तिला तिच्या स्त्रीत्वाचे ओझे वाटत असते. तिला लहानपणापासून पुरुषपणच आवडते. म्हणूनच आजही पुरुषांसारख्या कपड्यातच तिला समाधान वाटते, त्यांच्यासारखी सिगरेट पिणे, पुरुषी खेळ खेळणे तिला आवडते. हे तिचे पुरुषीपण वरवरचे नाही, ते खोलवर रुजलेले आहे. आपले पुरुषपण स्वतःच्या लक्षात आल्यावर ती


Volume - 7 Special Issue1, 2020, ISSN: 2348–604X (p); 2348–6058 (e), Impact Factor - 7.9 © 2020 DAMA International. Proceedings of the International Conference on Science & Science Fiction Organised by Shri Mukatanand College, Gangapur, Aurangabad (MS) - India, 10th & 11th January, 2020. Editors reserve all rights.

फार अस्वस्थ होते. आपल्याला कोण घडवून पाठवतो? आपण असतो तसे का असतो? अशा डोके गरगरायला लावणाऱ्या प्रश्नाचा ती विचार करते. शेवटी असलेले पुरुषीपण ती स्वीकारते. नमाच्या मिठीत ते सळसळून वर येते आणि त्या दिवसापासून आपल्या या पुरुषीवृत्तीची ती गुलाम होते. अशा प्रकारच्या व्यक्तीची मानसिक अवस्था सामान्य माणसासारखी नसते, ती वेळोवेळी बदलत असते. अशा ट्रान्ससेक्शुअल व्यक्तींचा बराच अभ्यास केला गेला आहे. *"Weninberg and williams (1974) found that male homosexuals to be less happy than their heterosexual controls but to have no more psychosomatic symptoms. Bell adn Weinberg, (1978) found not only more psychosomatic symptoms, but also morelonelyness, lower. self – acceptance and more depression and suicidal ideas, 20% of their homosexual men had previously made a suicidal attempts compared with 70% of their controls. The picture for lesbial woman is similar, although perhaps a littlemore cheerful. Sagirs and Robins (1974) found lesbians to be more neurotics than their heterosexual counterparts. Two studies (revieved) by Riess at (1974) suggested that lesbian may have stronger or more adaptive personlities than heterosexual women, at least in terms of independence. In Bell adn weinberg's (1978) study, the lesbian women reported less current happiness, lower self esteem and more suicidal ideas.*

अशाप्रकारे अभ्यासाअंती असे दिसून येते की, समलिंगी आकर्षण असणाऱ्या पुरुषात आणि स्त्रीयांमध्ये काही समान मानसिक लक्षणे दिसतात. त्यात एकाकीपणाने जगणे, निराशेचे झटके येणे, स्वतःला स्वीकारण्याची तयारी नसणे, शीघ्रकोपी असणे, आत्महत्येचा विचार वारंवार मनात येणे अशी मुख्य लक्षणे आहेत. मित्रालाही असेच निराशेचे झटके येत असतात. तिची मनस्थिती वारंवार बदलतना दिसते. घडणाऱ्या शक्यतो सर्वच गोष्टींचा तिला राग येत असतो. अशात ती एकदा आत्महत्या करुन स्वतःला संपवण्याचाही प्रयत्न करुन पाहते, नतंर मात्र नमाच्या सहवासात तिला विलक्षण सुखाची प्राप्ती होते. आपल्याला हव्या तशा जीवनाची स्वप्ने ती रंगवायला लागते. हे स्वप्न नमाशिवाय पूर्ण होणार नाहीत हे तिला ठाऊक असल्याने तिच्या मनात नमाचेच विचार येतात. त्यातच ती नमावर हक्क गाजवायला पाहू लागते. या गोष्टीचा अतिरेक नमाला सहन न झाल्याने ती तिच्यापासून दूर होते, आणि मित्रा आत्महत्या करते. मित्राची ही जी शोकात्मिका घडली आहे. त्याला कारण फक्त तिचे समलिंगी आकर्षण हे एकच नाही; तर ती मुळात जिद्दी आणि हट्टीही आहे. खरं तर तिने मनात आणले तर त्या महाविद्यालयात तिला एखादी दुसरी मुलगी मिळू शकत होती परंतु तसा साधा प्रयत्नही ती करताना दिसून येत नाही, आणि तसे ती बापूजवळ कबुलही करते. नमा मिळत नाही म्हणून तिचे दारु पिणे, प्रेमवेड्या मजनुसारखे हिंडणे हे सर्व तिची नमाबद्दलच्या असलेल्या ओढीमुळे होते.

सिग्मन फ्रॉईड या मानसशास्त्रीय संशोधकाने मानवी वर्तन आणि मानवी मन या संदर्भात अनेक नवनवीन संशोधन केले. या संशोधनाने मानवी अंतर्मनाचे द्वार मोकळे झाले. फ्रॉईडच्या संशोधनाचा निष्कर्ष असा की मानवाच्या मनात कामक्षुधा, अन्नक्षुधा अशा अनेक प्रवृत्ती खोलवर रुजलेल्या असतात. शामाजिक बंधने व संस्कार


Volume - 7 Special Issue1, 2020, ISSN: 2348–604X (p); 2348–6058 (e), Impact Factor - 7.9 © 2020 DAMA International. Proceedings of the International Conference on Science & Science Fiction Organised by Shri Mukatanand College, Gangapur, Aurangabad (MS) - India, 10th & 11th January, 2020. Editors reserve all rights.

याने काही काळ त्या दडपल्या जातील पण मानवी मनाला त्या नेहमी पोखरत असतात. सामाजिक बंधने व संस्कार याने काही काळ त्या दडपल्या जातील पण मानवी मनाला त्या नेहमी पोखरत असतात व कधीतरी त्याचा उद्रेक होतो. म्हणूनच मानव त्याचे अंतर्मन याचा नाटकातून विचार होवू लागला. मानवी अनुभवाच्या अनेक पातळया, त्या अनुभवाचे संमिश्र स्वरुप, त्याच्या स्वभावातली विसंगती, त्याचे विघटित मन, त्याचा कृतीमागील अनेकविध शक्ती, बाह्य सृष्टितील घटनांचे व त्याचे संबध याचे दर्शन घडल्याशिवाय मानवी जीवनाचा खरा आशय ध्यानात येणार नाही हे जाणवू लागले, म्हणूनच पूर्वीचे इष्ट-अनिष्ट, श्लील-अश्लिल व मंगल-अमंगलस संकेत वाड्.मयबाह्य म्हणून झुगारुन दिले गेले. स्वप्नरंजन, आदर्शवाद आणि उपदेश याचा मराठी नाटकावरील प्रभाव कमी झाला. मानवी मनाचे अनेक पापुद्रे, मानवी मनाची प्रकृती आणि विकृती, मानवी अनुभवाची तीव्रता, सखोलता आणि व्यामिश्रता याचा मराठी नाटकातून विचार होऊ लागला.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार केला असता आपल्याला लक्षात येते की या नाटकाला भलेही केवळ एक नाटक म्हटले गेले असले आणि या नाटकाला विज्ञाननाट्य असे जरी संबोधले गेले नसले तरी नाटकाची लेखनाची भिस्त ही पूर्णतः विज्ञानावर आधारलेली आहे. आणि म्हणून मध्यंतरीच्या काळात अशी अनेक नाटके जी विज्ञानाच्या जवळ जाणारी किंवा पूर्णतः विज्ञानावर अवलंबून असलेली होती मात्र तिला विशिष्ट विज्ञाननाट्य म्हणून नामाभिधान प्राप्त होवू शकले नाही हे दूर्दैवच म्हणावे लागेल.

संदर्भ ग्रंथ...

१.विजय तेंडुलकर, मित्राची गोष्ट, नीलकंठ प्रकाशन पुणे ३०, प्रथम आवृत्ती जाने.१९८२
२. जॉन बॅनक्रिफ्ट, उत्तम नियतकालीक
३. रोहिणी हटंगडी, तें आणि आम्ही, १९९२
४. खोले विलास, साहित्य, अध्यापन आणि प्रकार, मॅजस्टिक प्रकाशन मुंबई, १९८७



Mary Shelley



Ursula K. Le Guin

If science fiction has a major gift to offer literature, I think it is just this: the capacity to face an open universe. Physically open, psychically open. No doors shut. What science, from physics and astronomy to history and psychology, has given us is the open universe: a cosmos that is not a simple, fixed hierarchy, but an immensely complex process in time. All the doors stand open, from the prehuman past through the incredible present to the terrible and hopeful future. All connections are possible. All alternatives are thinkable. It is not a comfortable, reassuring place. It's a very large house, a very drafty house. But it's the house we live in.



Octavia E. Butler

Science fiction has long treated people who might or might not exist - extraterrestrials. Unfortunately, however, many of the same science fiction writers who started us thinking about the possibility of extraterrestrial life did nothing to make us think about here-at-home human variation.



Isaac Asimov

The saddest aspect of life right now is that science gathers knowledge faster than society gathers wisdom.



Sir Jagadish Chandra Bose

It would be our worst enemy who would wish us to live only on the glories of the past and die off from the face of the earth in sheer passivity. By continuous achievement alone we can justify our great ancestry. We do not honour our ancestors by the false claim that they are omniscient and had nothing more to learn.

ISSN : 2348 – 604X (Print)
ISSN : 2348 – 6058 (Online)



# ISJ

# International Science Journal

(Peer-Reviewed)

Online and Print Version



| Volume 7 | Special Issue | 2020

Proceedings of the International Conference on Science and Science Fiction Organised by Shri Muktanand College, Gangapur, Aurangabad, Maharashtra - India, 10th & 11th January, 2020

Published Online at : http://www.sciencejournal.in